Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) Volume - 6 | Issue - 1 | Feb - 2016

# बंजारा स्त्रीयांचे सणाविषयक लोकगीते

सिंधु नामदेवराव राठोड
संशोधक विद्यार्थीनी, मराठी विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेड.

## प्रास्ताविक

लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचा महत्वपूर्ण भाग म्हणजे लोकसाहित्य. परंपरेने मौखिक पध्दतीने चालत आलेल्या सर्व कथा-गीतांना कोणी एक कर्ता नसतो.सर्व लोकांचे मनच ती कृती घडवीते व स्मृतीत टिकते.लोकजीवनात तिचा प्रवाहअखंडपणे चालतच राहतो. म्हणुन त्या कथांना म्हणावयाचे 'लोककथा 'आणि गीतांना म्हणावयाचे 'लोकगीते' .या लोककथा आणि लोकगीतांना जागे ठेवायचे काम ही लोकमतच करत असते.म्हणुन त्याला म्हणायचे 'लोकसाहित्य '.



लोकजीवन आणि लोकसाहित्य यांचे अभिन्नत्व असे आहे.लोकसाहित्य म्हणजे लोकांचे जीवन जगण्याची पध्दती असते.लोकजीवनाचा संदर्भ सोडून लोकसाहित्याचा अभ्यास करणे म्हणजे भुसा भरलेल्या प्राण्यांच्या निर्जीव शरीराचे निरीक्षण करण्यासारखे आहे असे प्रभाकर मांडे म्हणतात ते अतिशय महत्वाचे आहे.कारण लोक जीवन आणि लोकसाहित्य यांना आपण वेगळे करु शकत नाही.लोकजीवनात अनेक जाती -जमातीचे लोक राबत असतात.प्रत्येक समाजाने आपले वेगळेपण टिकवून ठेवलेले आहे.ते त्यांच्या लोकसाहित्याद्वारेच. ' बंजारा 'हा ही एक लक्षणीय समाज.ज्यांना बंजारा किंवा लमाणी नावच त्यांच्या लोकगीतावरुनच पडलेले आहे.ज्याप्रमाणे लोकसाहित्य हे सर्व समाजाचे तसेच लहान-वृध्द ,स्त्री-पुरुष सर्वाचे आहे.विशेष करुन स्त्रीयांचे लोकगीत विपुल प्रमाणात आपणास पाहावयास मिळतात आणि यात प्रामुख्याने 'बंजारा स्त्रीयांचे लोकगीतां 'चा विचार आपण करणार आहोत.

डॉ. कृष्णा इंगोले म्हणतात,'पारंपारिक लोकजीवनाचे एकही अंग असे नाही की ज्यावर लोकगीत निर्माण झालेले नाही '.म्हणजे लोकगीते समग्र लोकजीवनाला व्यापून राहिलेली दिसतात.शिवाय ज्या समाजात विपुल लोकसाहित्य निर्माण झालेले आहे तो समाज सांस्कृतिकदृष्टया संपन्न आहे असे मानले तर बंजारा समाज ही लोकसाहित्याच्या दृष्टीने संपन्न आहे असे म्हणता येईल.

कृषी संस्कृती आणि स्त्री संस्कृतीला लोकसाहित्याचे प्रतिक मानतात. बंजारा समाजातील स्त्रीया आजही शिक्षणापासुन वंचित आहे.परंतू या समाजात लोकसाहित्याची 'खाण 'असल्याचे दिसुन येते.कारण प्रसंग कोणताही असो सण-उत्सवाचा,विधी-विधानाचा,श्रमाचा असो त्या त्या प्रसंगी त्या आपल्या नृत्याद्वारे गीत गात असतात.बंजारा गीतांना लेंगी म्हणतात.ताल,लय,सुरांना विशेष महत्व देत डफलीच्या तालावर नृत्य करत ही लेंगी गायली जातात.समुहनृत्य सादर करत जणु एकतेचा संदेश त्या देत असतात.बंजारा समाजातील स्त्रीयांचे जीवन जरी मर्यादीत स्वरुपाचे असले तरी

जगण्याचे सार त्यांच्या गीतांद्वारे त्या प्रकट करतात.डॉ.परशुराम गिमेकर म्हणतात त्याप्रमाणे स्त्रीगीतात नवनवीन शब्दांची भर व लयीचे सामर्थ्य दिसुन येते.अनुभवसमृध्द व लयबध्द असलेल्या स्त्रियांच्या गीतांची निर्मिती निश्चित केव्हा झाली हे सांगणे अशक्य आहे.अशा या परंपरा प्रिय स्त्रीया आपल्या प्रत्येक गीतात भाव आहे तो भक्तीचा,सौंदर्याचा ,प्रेमाचा आणि कारुण्याचा,त्यांच्या गीतातून आपणास बंजारा संस्कृतीचे दर्शन घडते.बंजारा लोकगीतात एक प्रकारचा गोडवा व रसाळपणा आलेला आहे.त्यांच्या एकंदरीत सादर करण्याच्या पध्दतीने पाहणारा जनसमुदाय ही मग्न होवुन जातो.

### बंजारा जातीचे सण

❖ **दिवाळी :**

हिंदु संस्कृतीतील प्रत्येक जाती धर्मात उत्साहाने साजरी होणारा सण म्हणजे दिवाळी. या सणास बंजारा समाजातही मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो आणि मुख्य म्हणजे स्त्रीयांचा सण आणि एकतेची भावना निर्माण होवून पवित्र अशा बहीण भावाच्या नात्याला उजाळा देणारा हा सण आहे.पाच दिवसाच्या या सणाला पाचही दिवसाच्या महत्त्वानुसार साजरा केला जातो.यापैकी मुलींसाठी महत्त्वाचा दिवस तो म्हणजे लक्ष्मीपुजनाचा.या दिवशी मुली घरोघरी जावुन हातात दिवा घेवुन ' मेरा ' मागतात.या मागे असा उद्देश आहे की घरोघरी ' कुमारिका ' जावुन त्या घराच्या समृध्दीची इच्छा प्रकट करतात.म्हणजेच घरोघरी लक्ष्मीचा वास राहावा ,कोणी दु:खी राहु नये,घरोघरी सुख-समृध्दी राहावी जणू प्रत्यक्ष लक्ष्मीच घरोघरी जात असावी.

कुमारिका :

वरसे दाडेरी कोर दवाळी,  
आई तोन मेरा......  
वरसे दाडेरी कोर दवाळी  
बापू तोन मेरा.......  
वरसे दाडेरी कोर दवाळी  
याडी तोन मेरा......  
वरसे दणेरी कोर दवाळी  
ईरा तोन मेरा....

अशा प्रकारे ' कुमारिका ' मेरा मागत प्रत्येक घरी जातात.अशा काही गीताद्वारे कुमारिका आपल्या व्यक्तिंबद्दल आदर,प्रेमाची,जिव्हाळ्याची भावना त्या व्यक्त करत असतात.यावेळी कुमारिका एकत्रित येवून देवीजवळ जणु आपल्या लोकांना सुखी ठेवण्यासाठीच विनवणी करत असावेत असे आपणास दिसुन येते.

त्यानंतर गोधन पुजा करण्यासाठी शेतातून फुल,पाने आणतात.सर्व कुमारिका एकत्र येवून हा विधी केला जातो.आणलेली फुले-पाने घरोघरी जावुन शोणाचे गोळे करुन त्यात ही पाने-फुले खोवतात.त्यानंतर ते पुजले जातात. त्यावेळी....

कुमारिका ......

रिंडी,मिंडी,सोरख्या,बोधन्या  
हुंटेरी कतारे,घोडेरी कतारे  
लांबी लेरे,घोळी हरे  
टोकणीस माथेर,  
छादळास कानेर  
डोडीभर गावडी,  
तळावभरो छाच  
कुठाभरो घी,  
घण घण देस दवाळी माता,

सेंरी टांगे रुची करे.

म्हणतात.म्हणजेच गोधन हे गोर लोकांचं उघड धन आहे.ज्याद्वारे घरोघरी दुध,तुपाचं ऐश्वर्य राहते व पशुधन प्रत्येक घरी राहावे यासाठी ही आरती घेतली जाते.

❖ होळी :

बंजारा समाज आणि होळी असा एक समीकरणच झाल आहे.कारण लहान मोठे सर्वच जणांना एकत्र आणणारा वैरभाव विसरुन हसी मज्जाक आणि उत्साहाने साजरा करण्याचा हा सण.यातही स्त्रीगीतांना विशेष महत्वाचे स्थान आहे.होळीच्या गीतात स्त्रीया आपल्या सांसारिक अडचणी,देवाबद्दल श्रद्धा,शृंगारीकता,आपल्या व्यक्तिबद्दल प्रेम आणि बंजारा समाजाबद्दल असणारा आभिमान यांच्या गीतातून त्या व्यक्त करत असतात.

स्त्रिया........

सोनेरी विटेब उभो इटोबा
काई तोन भक्तेरी गोडी रे
पढंरीसे इटोबा ।
हाम बलाये जन तु कत गेतो
जनाबाईनं घटी पिसारोतो
वत कोणी आयो कटाळोरे
पढंरीरो इटोबा ।

किंवा

हारो मंडवा केती केती भरो छ ।
हारो मंडवा सेवाभायाती भरो छ ।

अशा काही भक्तीगीतातुन स्त्रीयांनी लोक संस्कृती टिकवुन ठेवली आहे.त्यांच्या श्रध्दा ,देवदेवतावरील निष्ठा, पावित्र्याच्या कल्पना, पूजाविधी,सणसमारंभ यादृारे आपल्या कल्पनेचा मनोरा रचुन त्या त्या ठिकाणी देवीदेवतांना ठेवुन त्या विविध भक्तीगीते होळी सणाला गात असतात.

स्त्रिया........

मारो संसार बाई
कोडीयारो माळो.......

अशा काही गीतातून सांसारिक भावना व्यक्त करतात.म्हणजे माझा संसार हे कोळ्याचं जाळं आहे.त्यातून कितीही निघण्याचा प्रयत्न केला तरी अडकुनच राहणार याप्रमाणे या संसाराला विविध 'उपमा 'देतात.

उदा.खोल विहीर, क्षितीज यांचाही या गीतात उपमा देतांना आपणास दिसते.

स्त्री........

चालये गोरी हाम जतरान जावा
चालये गोरी हाम जतरान जावा
जतरा माईती काई काई लाया
मिस कॉल कर मारे फोने परीया
काई छमछम वाजे तारी झांझरीया

अशा काही गंमतीदार लेंगी स्त्री-पुरुष दोन्हीही आपआपल्या पध्दतीने नृत्याद्वारे गायली जातात.शिवाय

स्त्रीया......

कुकडो बांग दिणो बोडी बाई
नींद जागी कोणी काई ।
मारोबाप हुंडा दिनो सासुबाई

ओन मोजी कोणी काई
मारो बाप टिव्ही दिणो सासुबाई
ओन दिटी कोणी काई।
मारो बाप फॅन दिनो सासुबाई
हव्यासादी कोणी काई।

अशी ही मनोरंजन प्रधान गीते या होळीच्या निमित्ताने गायली जातात.समाज वास्तवता दाखविण्याचे काम अशा गीताद्वारे या स्त्रीया करत असतात.

### ❖ झोकापंचमी :

शेतीची कामे जेव्हा आटोपशीर येतात तेव्हा येतो झोकापंचमी.यावेळी नवविवाहीत स्त्री माहेरपणासाठी येते.तिच्या सोबत तिच्या सख्याही .सर्वांच्या गाठीभेटी होवून सुख-दु:ख एकमेकींजवळ व्यक्त करतात. वआपल्या 'विरा 'ला म्हणजेच भावाला विनवणी करतात की...

स्त्रीया.......

झोका दरं विरा पालणो
इ छ रे तारी भेण
जालनानं जाजो इरा
झोका बी लाजेरे
ओ झोका पे तारी भेणे नं बसार रे ।

अशा प्रकारे प्रत्येक स्त्री ही आपल्या भावास अधिकाराने आपली मागणी पुर्ण करण्यास सांगते.यामागे 'पुरुष ' संस्कृतीचे दर्शन आपणास होते.शिवाय बहीण-भावाचे अतुट नात्याचेही दर्शन होते.

### ❖ तीज :

'तीज 'हा दहा दिवसाचा सण.खास कुमारिकासाठीचा असतो.छोटया छोटया दूरडीत काळी माती भरुन त्यात गहु पेरले जाते.त्यात रोज नदीहून पाणी आणुन दहाही दिवस त्यात टाकले जाते.यात कुमारिका सोबत स्त्रीयांही उत्साहाने सहभागी होतात.व नृत्याद्वारे विविध गीते सादर करतात.

उदा.

स्त्रीया.....

जत मतरो व तं गोकुळ नगरी
आसे नगरी में सेवाभाया विराजे
दवाई पडरं छेरी वाळेरी
जय बोलो लच्छमण बालारी.....

म्हणजेच ज्या वस्तीत एकमत ती गोकुळ नगरी.अशा नगरीत साक्षात सेवा विराजतो.तिथे घेरी असलेल्या हातात सोण निलुंगी घातलेल्या सेवाची दवाई पडते.म्हणजे दृष्ट काम करणा-यांना सेवाभाया शिक्षा देतोच.अशा प्रकारची भावना व्यक्त करत त्या एक प्रकारे चांगले कर्म करण्यास जणु प्रेरणाच देतात.

स्त्रीया......

तोन कुण बोरायो
तीज गव्हुला डेडेरीया
तोन बापू बोरायो
तीज गव्हुला डेडेरीया.....

म्हणजेच तीज तुला कोणी रुजवलयं.गहु हिरव्यागार डुला लागलाय.बापून रुजवलय आणि मेघराजाच्या वर्षावानं तू डुलत आहेत.या द्वारे मेघाचं हे ऋण त्या व्यक्त करत असाव्यात.

या सणाव्यतिरिक्त बंजारा स्त्रीया प्रत्येक ठिकाणी आपल्या लोकगीते सादर करत असतात.लग्न विधीसारखा सोहळा असो वा देवदेवता व उपासना विषयक गीते,श्रमगीते, मनोरंजक व प्रबोधनकारक गीते सादर करत असतात.लयबध्द शब्दरचना अर्थाची जोड देत तर कधी अर्थहीन पण लयबध्द शब्दरचना करत ठेका धरत मनोरंजन स्वत: सोबत समाजाचेही करत असतात.एकत्रितपणे नृत्य सादर करत या स्त्रीया आपल्या भावविश्वात हरवून जातात.

## समारोप :

अशा प्रकारे बंजारा समाजातील सणाविषयक लोकगीताचा विचार आपणास असे दिसुन येते की अशिक्षित समाजातील स्त्रीया असुनही त्यांचे अनुभव विश्व दांडगे आहे.याद्वारे मानवी जीवनातील विविध भाव छटांचे मनोहारी व हृदयंगम दर्शन घडते.या सणानिमित्त त्यांच्या जीवनातील सुख-दु:खाच्या,प्रणयाच्या,वात्सल्याच्या भावना व्यक्त होतात.बहीणीची भावावरील माया,मायबापाबद्दल कृतज्ञता,देवाबद्दलची श्रध्दा,या गीताद्वारे समाजाला एकतेचा,बंधुत्वाचा आणि आनंदी राहण्यासाठी संदेश देत असतात.आपणास असेही म्हणता येईल की,आजच्या जागतिकीकरणात आजही बंजारा संस्कृती टिकविण्याचे काम या स्त्रीया करत आहेत.आपल्या कलात्मकतेचा विचार करत आपल्या गीतात लवचिकता आणुन नाविन्यतेचे रुप देण्याचा प्रयत्न या स्त्रीया करत असतात.

शेवटी द.ता.भोसले म्हणतात त्याप्रमाणे की,अनेक जाती-जमातीत असलेल्या या भारत देशात एकच एक संस्कृती कधी नांदत नसते.दुस-या संस्कृतीच्या संपर्क आणि साहचर्यामुळे अनेक देवदेवतांची भक्ती,पुजाप्रकार,संकेत येथे मान्य झालेले असतात.दुस-या

संस्कृतीतले अनेक चांगले घटक कळत न कळत या संस्कृतीत येवुन मिसळतात.त्याप्रमाणे बंजारा समाजानेही मोठ्या प्रमाणात असलेल्या मराठा समाजाचे काही चांगल्या घटकांचा आपल्या संस्कृतीत समावेश करुन घेतलेला आहे.म्हणुन बंजारा संस्कृती + मराठा संस्कृतीचा मिलाप होवुन एक वैशिष्टये पुर्ण अशी संस्कृती बनलेली आहेआणि त्याचा परिणाम लोकगीतात झालेला आहे.

## संदर्भ सुची :


१. लोकसाहित्याचे अंत२०.क्र.पृ .प्रभाकर मांडे - प्रवाह:
२. लोक संस्कृतीतील स्त्रीरुपे १३.क्र.पृ .कृष्णा इंगोले.डॉ -
३. तत्रैव पृ१४.क्र.
४. मराठवाडयातील दलितांचे लोकसाहित्य .५२.क्र.पृ . गिमेकर.प.डॉ -
५. संकलीत बंजारा स्त्रीगीते.
६. तत्रैव
७. संस्कृतीच्या पाऊलखुणा१५.क्र.पृ. भोसले .ता.द -





सिंधु नामदेवराव राठोड
संशोधक विद्यार्थीनी, मराठी विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.